महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

## (महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग ६- अ करिता)

क्र.पोमसं/५/१०/लो.नि.-२०२४/पोउपनि बदली /१३/२०२४, मुंबई, दि.: - ३०/०१/२०२४

वाचा :- १. महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१,

२. मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.437/6/1/INST/ECI/ FUNCT/ MCC/2023, दि.२१/१२/२०२३,

३. या कार्यालयाचे क्र. पोमसं.३/ १०/६/निवडणूक आयोग-सूचना/१९०/२०२३, दि. ०३/०१/२०२४ व दि.०८/०१/२०२४ चे ज्ञापन

४. पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दि. ३०/०१/२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त.

## -: आ दे श :-

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दि.२१/१२/२०२३ च्या पत्रान्वये आगामी लोकसभा निवडणूका मुक्त आणि स्वच्छ वातावरणात पार पाडण्याकरिता दिलेल्या मार्गदर्शक सूचना / निर्देशांनुसार सर्व पोलीस आयुक्त व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक या घटक प्रमुखांकडून बदलीपात्र नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांची माहिती मागविण्यात आली. त्यानुसार सर्व संबंधीत घटक प्रमुखांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील माहितीची छाननी करुन छाननीअंती (अ) स्वग्राम जिल्ह्यात नेमणूकीस असलेले पोलीस अधिकारी व (ब) दि.३०/०६/२०२४ पर्यंत किंवा त्यापुर्वी मागील ०४ वर्षांपैकी ०३ वर्षे कार्यकाल पूर्ण झालेले अधिकारी या निकषांप्रमाणे बदलीपात्र नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांच्या याद्या तयार करण्यात आल्या. सदर याद्यांमधील नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांच्या निवडणूक कामकाजाच्या अनुषंगाने बदली संदर्भात विचारविनियम करुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न (२) मधील तरतुदींनुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रशासकीय निकडीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणुन प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन, खालील नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांच्या त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र.४ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी बदली करण्याचा पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी निर्णय घेतला आहे:-

| अ.क्र. | नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांचे नांव | सध्याची नेमणूक | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | हनुमंतराव नागप्पा बादोले | सोलापूर शहर | कोल्हापूर परिक्षेत्र |
| २. | प्रविण श्रीमंत दाईगडे | सोलापूर शहर | नाशिक शहर |
| ३. | सचिन शिवशंकर मंदुपकर | सोलापूर शहर | नाशिक शहर |
| ४. | देविदास शिवाजी भालेराव | नाशिक शहर | नाशिक परिक्षेत्र |
| ५. | बाळु पोपटराव गिते | नाशिक शहर | नाशिक परिक्षेत्र |
| ६. | शाम सोनाजी जाधव | नाशिक शहर | नाशिक परिक्षेत्र |
| ७. | सोनाल चंद्रभान फडोळ | नाशिक शहर | नाशिक परिक्षेत्र |
| ८. | तेजल सुरेश पवार | नाशिक शहर | ठाणे शहर |
| ९. | युनिस अब्दुलरहीम शेख | नाशिक शहर | नाशिक परिक्षेत्र |

| अ.क्र. | नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांचे नांव | सध्याची नेमणूक | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १०. | रविंद्र सात्वन मुन्तोडे | नाशिक शहर | नाशिक परिक्षेत्र |
| ११. | केशव निवृत्ती आडके | नाशिक शहर | नाशिक परिक्षेत्र |
| १२. | छाया माधवराव वाघ | नाशिक शहर | ठाणे शहर |
| १३. | अशोक त्रंबक पाथरे | नाशिक शहर | ठाणे शहर |
| १४. | रमेश गोविंद घडवजे | नाशिक शहर | नाशिक परिक्षेत्र |

Kmmg Prasanna/30.01.24

(के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रत,

पोलीस आयुक्त, ठाणे शहर / नाशिक शहर / सोलापूर शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परि / नाशिक परि.

२. संबंधित घटक प्रमुखांनी या बदली आदेशाची प्रत संबंधीत नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक यांना तात्काळ बजावून त्यांना विनाविलंब कार्यमुक्त करावे. तसेच, सदर बदली आदेशाची प्रत त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहीत स्वाक्षरी घ्यावी व ती पोच या कार्यालयास पाठवावी. बदली झालेल्या नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांना कार्यमुक्त करताना पर्यायी / बदलीवर येणाऱ्या नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांची वाट पाहू नये. तसेच, संबंधीत नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांना पदग्रहण अवधी न उपभोगता तात्काळ बदलीच्या ठिकाणी हजर होण्याचे लेखी निर्देश देखील द्यावेत. संबंधीत नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांना बदलीवर कार्यमुक्त केले नाही, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत घटक प्रमुखांवर राहील. त्याचप्रमाणे बदली आदेशाधीन नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांना बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही ते त्यांच्या बदलीच्या घटकात विहित वेळेत हजर झाले नाहीत, तर ते शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील.

३. सदर बदलीच्या आदेशामुळे ज्या जागा रिक्त राहणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकातील इतर नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांकडे तात्काळ सोपवावा.

४. बदलीवरील नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा.न्यायालयाचे अथवा मा.न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास ते विचारात घेवून पुढील कार्यवाही करावी.

५. ज्या ठिकाणी स्थानिक निवडणूक संबंधाने आचारसंहिता लागू आहे, त्या ठिकाणांच्या अधिकाऱ्यांना आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर तात्काळ कार्यमुक्त करावे.

६. बदलीवर हजर झालेल्या नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांना घटकांतर्गत पदस्थापना देताना कार्यकारी पदात नेमणूक द्यावयाची असल्यास मुळ जिल्हात नेमणूक देण्यात येऊ नये. तसेच मा.केंद्रीय निवडणूक आयोगाने दि.२१/१२/२०२३ च्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होणार नाही, याची संबंधीत घटक प्रमुखांनी नोंद घ्यावी.

७. सदरचे आदेश घटक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे निर्गमित करण्यात येत असून त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असल्यास तसे या कार्यालयास कळवून पुढील आदेशाची वाट पहावी.

८. बदली आदेशानंतर जे नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्णनिवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

९.	बदली झालेले नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक बदली ठिकाणी हजर न झाल्यास त्यांच्या बदली आदेशात नेमणूक केलेल्या ठिकाणात अंशत: बदल करणे / बदली रद्द करणे / बदलीस स्थगिती देणे अशा विनंतीचा विचार केला जाणार नाही याची संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना लेखी सूचना द्यावी.

१०.	उपरोक्त घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात हजर झालेल्या नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांची नांवे व त्यांच्या घटकातून बदली ठिकाणी कार्यमुक्त केलेल्या नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांची नावे हजर झालेल्या / कार्यमुक्त केलेल्या दिनांकासह या कार्यालयास कळवावीत. जे नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही अद्याप हजर झालेले नाहीत त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवून त्यांच्याविरुध्द घटक प्रमुखांनी या कार्यालयाचे क्र.पोमसं/३/५५०७/०६/९७, दि.१३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे शिस्तभंगविषयक कार्यवाही तातडीने सुरु करावी. सदरची माहिती या कार्यालयातील लक्षवेध :- कार्यासन अधिकारी, का.क्र. ५ यांना ई-मेलद्वारे [desk5.dgoffice@mahapolice.gov.in] पाठवावी.

**प्रत सविनय सादर,**

मा.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.

**(लक्षवेध :-** कक्ष अधिकारी, पोल-५ब)

महालेखाकार-०१, महाराष्ट्र राज्य, मुंबई / महालेखाकार-०२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,**

कार्यालय अधीक्षक, का. क्र. ३ / ४ / ९ / ११ / ३६ व ४० (पोमसं कार्यालय).

**प्रत-**	पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोमसं कार्यालय, मुंबई.

२/-	यांनी सदरचे आदेश लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक यांचे बदली आदेश **(Transfer order of Unarmed Police Sub Inspector for Loksabha-2024)** या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करून द्यावेत.